महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९२ वा | दिनांक : २०/०९/२०२५ | वार : शनिवार

## मंत्री इतर कामात व्यस्त राहणार असतील तर त्यांना मंत्रिपद सोडावे लागणार : अजित पवार



**नागपूर** : सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री आपले नियमित कामकाज सोडून इतर काम केली तर त्यांना मंत्रिपद सोडावे लागेल, असा इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी शुक्रवारी आपल्या नेत्यांना दिला. पालकमंत्र्यांना आठवड्यातील 3 दिवस आपल्या मतदारसंघात काढावेच लागतील, असेही ते या प्रकरणी म्हणालेत.

नागपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे चिंतन शिबिर सुरू झाले आहे. या शिबिरात उपस्थितांना मार्गदर्शन करताना अजित पवारांनी वरील इशारा दिला. ते म्हणाले, आज आपण चिंतन शिबिराच्या निमित्ताने एकत्र आलोत. या सभागृहात जवळपास 500 पदाधिकारी व नेते व सहकारी उपस्थित आहेत. हे माझे कुटुंबच आहे. तुमच्या प्रत्येकाच्या पाठिशी लाखो लोक आहेत. त्यामुळे तुमच्या उपस्थितीमुळे मला नव्या उमेदीने व नव्या आशेने पुढे जाण्याची ताकद मिळते. हे चिंतन शिबिर केवळ पुढच्या निवडकांसाठी नाही. पुढच्या पिढीसाठी आहे.

आज केवळ भाषणे करून वेळ घालवायचा नाही. आज प्रामाणिक चर्चा, धाडसी कल्पना व ठोस निर्णय घ्यायचे आहेत. आज सायंकाळपर्यंत आपण सर्वजण मिळवून जो आराखडा ठरवून त्यालाच आपण नागपूर डिक्लेरशन म्हणून मांडणार आहोत.

अजित पवार म्हणाले, कोणतीही संघटना केवळ वरच्या पातळीवरून मजबूत होत नाही. ती तळागाळातून बांधली जाते. त्यामुळे मी ठामपणे सांगतो की, प्रत्येक नेत्याने व पदाधिकाऱ्याने काही ठराविक प्रकारचे संवादाचे टचपॉइंट लोकांबरोबर ठेवले पाहिजेत. बुथ-स्तरीय संवाद, प्रभाग सभा, जनसंवाद शिबिरे, राष्ट्रवादी परिवार मिलन, युवक टाउन हॉल, महिला बचतगट बैठक, आणि उद्योग, रोजगार सुविधा शिबिरे आपण वर्षभर शिस्तीने केले, तर आपला पक्ष नेहमी लोकांच्या जवळ राहील. राष्ट्रवादीचे नेते केवळ निवडणुकीच्या वेळीच दिसतात असे कोणत्याही नागरिकाला वाटता कामा नये, असे अजित पवार म्हणाले.

अजित पवारांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीवरही भाष्य केले. ते म्हणाले, आपण भाजपच्या नेतृत्वातील महायुती सरकारमध्ये सर्वात ज्यूनिअर आहोत. अनेकजण मला हे पाऊल का टाकले? असा प्रश्न करतात. वैयक्तिक व कौटुंबिक नात्यांत वेदना का स्वीकारल्या? असे विचारतात. मी मनापासून सांगतो की, ही सत्ता किंवा पदासाठी उचललेली पाऊले नव्हती. महाराष्ट्राला स्थिरता, प्रगती व ठोस निर्णयाची गरज आहे. या माझ्या अंतःकरणाच्या हाकेने मी हा मार्ग निवडला. मी एखादी फाईल पुढे सरकवली व एखाद्या गावाला पाणी मिळाले की मला समाधान मिळते.

आपण जमीन व परवानगीचा विषय सोडवला व एखादा कारखाना सुरू झाला आणि त्यातून हजारो तरुणांना रोजगार मिळाला की मला खऱ्या आनंदाची जाणीव होते. प्रत्येक रात्री झोपण्यापूर्वी मी स्वतःला एक प्रश्न विचारतो की, आज मी किती लोकांचे जीवन सुधारले? हाच माझ्या यशाचा मापदंड आहे. हाच माझ्या राजकारणात असण्याचा मुख्य हेतू आहे, असे अजित पवार म्हणाले.

## शेतकऱ्यांना मदतीसाठी सरकार कटिबद्ध : कृषीमंत्री दत्तात्रय भरणे



**नागपूर** : ओला दुष्काळाच्या बाबतीत संपूर्ण परिस्थितीचा अंदाज घेतला जाईल. यानंतर राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री आणि आमच्या मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य त्यावर विचार करतील. हे सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. आमचा बेसच शेतकरी आहे. ग्रामीण भागामध्ये जे शेतकरी अडचणीत आहेत त्यांना मदत करणे आणि पाठिंबा देणं आमचे कर्तव्य आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटले आहे.

दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यामध्ये आतापर्यंत एकूण ३० जिल्ह्यांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. साधारण १९५ तालुके बाधित झाले आहेत. तर ६५४ मंडळातील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यात प्राथमिक अंदाजानुसार ६२ लाख १७ हजार ५४० एकर शेती पिकाचे नुकसान झाले आहे.

दत्तात्रय भरणे म्हणाले की, अतिवृष्टीच्या परिस्थितीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे या तिन्ही नेत्यांचे लक्ष आहे. त्यांनी आम्हाला सूचना दिला आहे त्यानुसार पालकमंत्री जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जात पाहणी करत आहेत. ज्या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून संपूर्ण नुकसान भरपाईच्या माध्यमामध्ये त्याला मदत केली जाईल.

दत्तात्रय भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे ओला दुष्काळ जाहीर करण्यावर योग्य तो निर्णय घेतील. सरकारकडून जिथे जिथे नुकसान झाले तिथे तिथे पंचनामे करण्याचे काम खूप मोठ्या प्रमाणामध्ये महसूल विभाग आणि कृषी विभागाकडून मोठ्या प्रमाणामध्ये करत आहे.

दत्तात्रय भरणे म्हणाले की, महायुती सरकार हे मराठा आणि ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही, जे योग्य आहे त्या प्रमाणे काम करेल. जयंत पाटील यांच्यावर आमदार गोपीचंद पडळकर यांनी टीका केली यावर बोलताना भरणे म्हणाले की, कुणीही कुणावर खालच्या पातळीवर टीका करणे योग्य नाही. तर दादा-ताई एकत्र या बॅनरवर मी ते अजून पाहिलेच नाही म्हणत त्यांनी बोलणं टाळलं आहे.

## जिल्ह्यांना मिळणार ५, ३, २ कोटींची पारितोषिके : शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे

**पुणे** : राज्यातील गुणवत्तापूर्ण व नाविन्यपूर्ण शिक्षण उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मोठी घोषणा केली आहे. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद व महानगरपालिकांना अनुक्रमे 5 कोटी, 3 कोटी आणि 2 कोटी रुपयांची प्रोत्साहनपर पारितोषिके दिली जातील, असे त्यांनी पुण्यात सांगितले.

बालेवाडी येथील हॉटेल ऑर्किड येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय शालेय शिक्षण परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या परिषदेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. राज्यातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना देणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. या उद्घाटन सोहळ्यास शालेय विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, शिक्षण विभागाचे आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह यांच्यासह शिक्षण विभागातील अनेक वरिष्ठ अधिकारी, विविध जिल्ह्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महापालिका आयुक्त उपस्थित होते.

भुसे यांनी यावेळी शिक्षण आनंददायी, गुणवत्तापूर्ण, भाकरीचे आणि राष्ट्रीयत्वाचे असावे यावर भर दिला. महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर यावा यासाठी शिक्षण विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञानाचा वापर, पायाभूत सुविधा सुधारणा, प्रधानमंत्री पोषण शक्ती योजना, शिष्यवृत्ती परीक्षा व निपुण भारत अभियान यांसारखे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांच्या चौकसपणासाठी शैक्षणिक सहलींचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आणि ऐतिहासिक स्थळांना भेटी, शेतीतील कामांचे निरीक्षण तसेच बँकेचे व्यवहार समजून घेण्यासाठी सहली काढण्याच्या सूचना दिल्या. लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा आणि बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त प्रश्नमंजुषा घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

शालेय स्तरावरील 15 समित्यांचे रूपांतर चार समित्यांमध्ये करून अधिक प्रभावी कामकाज सुरू असल्याचे भुसे यांनी सांगितले. तसेच, पुढील शैक्षणिक वर्षापासून चौथी व सातवी इयत्तेसाठी शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा घेण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

यावेळी शालेय विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांनी शिक्षण व आरोग्य या दोन क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन केले. शासन निर्णय तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी महापालिका आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यक्षमतेने पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० सप्टेंबर २०२५

## पाटोद्याच्या जयभवानीत मुक्त विद्यापीठाचे प्रवेश सुरू

**पाटोद (प्रतिनिधी) :** पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय,पाटोदा येथे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक चे केंद्र क्रंमाक [ २२१६४ ] या केंद्रामध्ये नौकरी करत असलेल्या विद्यार्थ्यांना बहिस्थ उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली आहे.

बी.ए.प्रथम,द्वितीय,तृतीय वर्ष ,या वर्गाचे प्रवेश सुरू झाले आहेत.तरी पाटोदा तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांना बहिस्थ म्हणुन बी.ए. वर्गाला प्रवेश घेवयाचे असतील त्यांनी ३० सप्टेबर पर्यंत महाविद्यालयाच्या अभ्यास केंद्राशी संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा.

प्रवेशाच्या अधिक माहिती साठी केंद्र संयोजक प्रा.डॉ. वंदन जाधव,संपर्क मो.(९४२१३३९३५५) साह्यक केंद्र संयोजक प्रा. डॉ.अशोक देवगुडे संपर्क मो.न.( ८६६८२७१५१९ ) व तंत्र स्नेही श्री.दिपक जावळे संपर्क मो.नं.(९०९६७१४४१३)श्री. रमेश गिरे संपर्क मो.न.( ८२७५००३७३३ ) यांच्याशी संपर्क साधावा असे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम,अभ्यास केंद्राचे केंद्र प्रमुख प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे,केंद्र संयोजक प्रा.डॉ.वंदन जाधव,सहकेंद्र संयोजक प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी कळविले आहे.

## छत्रपती संभाजीनगर येथे श्री संत किसन महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री संत किसन महाराज यांची पुण्यतिथी भक्तिभावाने साजरी करण्यात आली. ज्योती नगर येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर परिसरात हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ ते ११ या वेळेत भजनाने झाली. त्यानंतर ११.३० ते १.३० या वेळेत ह. भ. प. भागवताचार्य शिवदास महाराज आघाव (आळंदी देवाची) यांनी कीर्तनाची सेवा बजावून उपस्थितांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले. त्यांच्या कीर्तनाने वातावरण भारावून गेले.

या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन श्री संत किसन महाराज भक्त परिवार, व भामटी समाज छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले होते.

कीर्तनानंतर लगेचच महाप्रसादास सुरुवात झाली कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




## विद्यार्थ्यांनी वाईट प्रवृत्तीपासून दूर राहून सर्वोच्च ध्येय प्राप्त करावे : पोलीस निरीक्षक राजेश मयेकर




**छत्रपती संभाजीनगर :** सोशल मिडियाच्या विश्वात आजची तरुणपिढी जीवन जगत असून सोशल मिडियामुळे अनेक अनुचित प्रकार घडतात आणि त्याचे वाईट परिणाम विद्यार्थी दशेतच तरुण-तरुणींना भोगावे लागतात, म्हणून विद्यार्थ्यांनी सद-सदविवेक बुद्धीचा वापर करुन या वाईट प्रवृत्तीपासून दूर राहून जीवनाचे सर्वोच्च ध्येय प्राप्त करावे असे प्रतिपादन महिला तक्रार निवारण केंद्राचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश मयेकर यांनी केले.

मिलिंद कला महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या अॅंटी रॅगिंग जनजागृती कार्यक्रमात वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश मयेकर मार्गदर्शन करत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान बोलत होत्या. तर मंचावर उपप्राचार्य डॉ. संतोष बुरकुल यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश मयेकर पुढे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या या महाविद्यालयात रॅगिंगसारखे प्रकार होत नाहीत याचा अभिमान वाटतो, परंतु विद्यार्थी व विद्यार्थीनीमधील संबंध हे मैत्रीपूर्ण असावेत.

या संबंधामध्ये कोणताही वाईट उद्देश असेल तर त्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक करिअरवर विपरीत परिणाम होतो. म्हणून विद्यार्थ्यांनी सोशल मिडिया, प्रेम, लिव-इन-रिलेशन या आपल्या संस्कृतीत नसलेल्या मोहजालापासून दूर रहावे व अभ्यासात लक्ष देऊन शैक्षणिक प्रगती करावी. विद्यार्थी व शिक्षकांनी रस्त्यावरुन बाईक चालवताना हेल्मेटचा वापर करावा, वाहतुक नियमांचे पालन करावे. विद्यार्थ्यांना व विशेषत: विद्यार्थीनींना काही अडचण असेल तर दामिनी पथकाशी संपर्क साधावा असे आवाहनही शेवटी त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासात लक्ष देऊन आपल्या आई-वडिलांच्या कष्टाचे चिज करावे व समाजात नावलौकिक मिळवावा तसेच महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. संतोष बुरकुल यांनी केले.

सुत्रसंचालन डॉ. एम.जी. शिंदे यांनी केले तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार डॉ. सतीश खरात यांनी मानले. या कार्यक्रमासाठी दामिनी पथकाच्या कॉन्स्टेबल श्रीमती शिंदे, श्रीमती खैरे, श्रीमती निंबोरे, श्रीमती नागरे, श्री. अजय चौधरी यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** अनेक दुर्घटना अपघातानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रशासना जागे धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र 752 वर करोडी तोल नाक्यापासून ते कन्नड या मार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहे.

या खड्डे वाचवताना अनेक अपघात झाले आहे अनेकांचे जीव गेले तर काहींना अपंगत्व आले आहे दि १७ बुधवार रोजी सुद्धा माळीवाडा येथील युवक ज्ञानेश्वर जगधने याचे दुचाकी ला एका ट्रक ने धक्का दिला व चिरडून निधन झाले होते.

या अश्या अनेक अपघाताची महाराष्ट्र जनहित ने खड्डे मुळे होणारे अपघाताची बातम्या वेळोवेळी प्रकाशित केली होती म्हणून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण जागे झाले यघटनेची दखल परिमंडळ1चे पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर व पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांनी पुढाकार घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण च्या अधिकारी व अभियंता माळीवाडा व फतीयाबाद येथील ग्रामस्थ पदाधिकारी यांच्या सोबत बैठक घेऊन खड्डे लवकरात लवकर बुजवण्यासाठी सूचना केल्या होत्या.

अधिकारी यांनी होकार देत आज दि १९ शुक्रवार पासून रेडी सिमेंट मेकर च्या साहयाने खडी टाकून खड्डे बुजवण्याचे काम माळीवाडा पुलापासून सुरू केले आहेपोलीस निरीक्षक यांनी स्वत: लक्ष देत त्याठिकाणी जाऊन पाहणी केली आहेआता किती दर्जेदार रस्त्याचे काम आहे किती दिवस टिकते आता ही येणारी वेळच सांगेल

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० सप्टेंबर २०२५

# शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे आरोग्य शिबीर संपन्न



**कन्नड (प्रा. शिवाजी हुसे) :** शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे उच्चशिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना आणि प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते.

(ता. १९ ) कार्यक्रमचे प्रमुख पाहुणे कन्नड येथिल प्राथमिक आरोग्य केद्रांचे डॉ . विशाल उंडे . डॉ पावरा व लॅब टेक्नीशयन अरविंद राठोड हे होते तर 'अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ मगर बी के होते .याप्रसंगी बोलताना डॉ विशाल उंडे यांनी विध्यार्थांना आरोग्य विषयक उपयुक्त माहिती दिली.

संतुलित आहार . व्यायाम आणि पचन संस्थे बद्दल माहिती दिली तसेच उच्चरक्तदाब व त्याचे शरिरात होणारे दूष्परिणाम याबद्दल मार्गदर्शन केलेडॉ.पावरा यांनी उपचारा शिवाय घेतल्यानंतर गोळ्या व औषधांचा शरीरावर काय दुष्परिणाम होतात हे सांगितले थॉयराईड. ल्युकेमिया सिकलसेल याची सविस्तर मार्गदर्शन केलेडॉ अरविंद राठोड यांनी उपस्थित विद्यार्थीव प्राध्यापक यांचा रक्तदाब तपासून माहिती दिलीअध्यक्षिय समारोम करतांना उपप्राचार्य डॉ मगर यांनी आरोग्य विषयी माहिती दिली या कार्यक्रमास डॉ मातकर व्ही डी आयक्युऐसी संचालक . एन एस एस प्रमुख डॉ महाजन पि बी .डॉ व डॉ सिमा काशिद डॉ पी के संघई प्राणिशास्त्र विभाग तसेच डॉ मोगरे .डॉ . सानप व डॉ .वडगुळे मीना वाणिज्य विभाग ह्या उपस्थितीत होताकार्यक्रमाचे प्रस्तावना व संचालन डॉ तानाजी जाधव प्राणीशास्त्र विभाग यांनी केले व आभार डॉ आहेरराव यांनो केले

# २४ व्या राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धेचे उद्घाटन बापूराव पाटील यांच्या हस्ते



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : नगर शिक्षण विकास मंडळ संचलित श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या वतीने आयोजित सांस्कृतिक सभागृहात शिक्षणमहर्षी कै. माधवराव (काका) पाटील यांच्या नावाने दरवर्षी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी (ता. १९) रोजी करण्यात आले. हे यंदाचे २४ वे वर्ष आहे.

यावेळी स्पर्धेचे उद्धाटक जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते. याप्रसंगी संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, पंचायत समितीचे सभापती मदन पाटील, उपसभापती गोविंद पाटील, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, संस्थेचे संचालक राजेंद्र भोसगे, प्रा. डॉ. सतिश शेळके, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सादक वली, प्राचार्य उल्हास घुरघुरे, परीक्षक प्रा. डॉ. संजय बिराजदार, डॉ. विवेकानंद वावळे, प्रा. डॉ. किरणसिंग राजपूत, प्रा. अशोक बावगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी महाविद्यालयातील आदर्श शिक्षक प्रा. डॉ. नागनाथ बनसोडे, प्रा. डॉ प्रकाश कुलकर्णी, शिक्षकेत्तर कर्मचारी मल्लिकार्जुन स्वामी यांचा बापूराव पाटील यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी केले. यावेळी डॉ. सतिश शेळके, डॉ. सादक वली यांनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. सपाटे म्हणाले की, कै. माधवराव पाटील यांनी या परिसरातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून संस्थेने लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षांमध्ये रूपांतर झाले आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा व व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा म्हणून दरवर्षी वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले जात असल्याचे शेवटी ते म्हणाले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. डॉ. राम बजगिरे यांनी मानले. यावेळी विविध महाविद्यालयाचे स्पर्धक, विविध शाखेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
• महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
• सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
• शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
• हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.
डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० सप्टेंबर २०२५


## देवगिरी महाविद्यालयाची महाराष्ट्र शासनाच्या राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराची हॅट्रिक


डॉ.जिजा शिंदे


डॉ.संतोष भोसले


डॉ.बाळासाहेब शिंदे

**छत्रपती संभाजीनगर :** समाजाची निस्वार्थ भावनेने आणि निष्ठेने सेवा करणाऱ्या व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन देण्याच्या व त्यांच्या गुणांचा यथोचित सन्मान करण्याच्या उद्देशाने राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात येतात.

यावर्षी महाराष्ट्र शासनाचा मानाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्कार(2024-25) डॉ.बाळासाहेब शिंदे यांना जाहीर झाला आहे आणि महाराष्ट्रात प्रथमतः देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा मानाने खोवला गेला आहे.

विशेष म्हणजे देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयाने शासनाच्या आदर्श शिक्षक पुरस्काराची (सलग- तीन वर्ष) हॅट्रिक साधण्याचा बहुमोल सन्मान आहे केला आहे. असी तिहेरी मोहर उमटविण्यारे देवगिरी महाविद्यालय हे महाराष्ट्रातील पहिलेच महाविद्यालय ठरले आहे.

सन 2023 मध्ये पाली विषयाचे डॉ.संतोष भोसले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला होता आणि दुसऱ्याच वर्षी म्हणजेसन 2024 मध्ये मराठी विषयाचे अध्यापन करणारे डॉ.जिजा शिंदे या पुरस्काराचा बहुमान मिळाला होता आणि यावर्षी म्हणजेच सन 2025 मध्ये इंग्रजी विषयाचे अध्यापन करणारे डॉ.बाळासाहेब शिंदे यांना नुकताच आदर्श शिक्षक पुरस्कार घोषित झाला आहे. ही खऱ्या अर्थाने देवगिरी महाविद्यालयासाठी सन्मानाची बाब ठरली आहे.

## महिला महाविद्यालयात 'पौष्टिक पाककला स्पर्धा' उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** सप्टेंबर हा पोषण महिना म्हणून संपूर्ण भारतात साजरा केला जातो. याच औचित्याने डॉ .सौ इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयाच्या गृहशास्त्र विभागातर्फे दरवर्षी पोषण महिना साजरा केला जातो.

यामध्ये विभागाची 'पाककला स्पर्धा' ही एक खास, सातत्याने घेण्यात येणारी सिग्नेचर ॲक्टिव्हिटी असून, यावर्षी ती "पौष्टिक दिवाळीचे फराळाचे पदार्थ" या विशेष थीमवर आयोजित करण्यात आली.दिवाळी म्हटली की फराळ हा महत्त्वाचा भाग मानला जातो. आजच्या धावपळीच्या व आरोग्य-जागरूक जीवनशैलीत पारंपरिक फराळाचे प्रमाण काहीसे कमी झाले असले तरी या संस्कृतीचा वारसा टिकवण्याच्या हेतूने विद्यार्थिनींना पौष्टिक पदार्थ सादर करण्याची संधी देण्यात आली.

स्पर्धेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत चटपटीत चिरोटे, मिश्रधान्याची भाजणीची चकली,पालक चकली, दाळव व गव्हाचे लाडू, विविध प्रकारचे शंकरपाळे, मुरुकु, चिवडे ,गोड व तिखट तसेच अनेक धान्यांचा वापर करून तयार केलेले पौष्टिक पदार्थ सादर केले. पारंपरिक व आधुनिकतेचा संगम असलेल्या या विविधरंगी पदार्थांनी परीक्षकांची मनं जिंकली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई होत्या, तर प्रमुख अतिथी व परीक्षक म्हणून महाविद्यालयाच्या सौ. ज्योती मंठाळकर उपस्थित होत्या. गृहशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिता अग्रवाल यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करत पोषण महिन्याचे महत्त्व, त्याची गरज आणि पाककलेतील सादरीकरण व इंद्रियांच्या सहभागाविषयी विचार मांडले. प्रमुख अतिथींनी विद्यार्थिनींच्या सर्जनशील पाककौशल्याचे कौतुक करून अभिनंदन केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करत, "या पाककला स्पर्धेतून शिकलेले कौशल्य दिवाळीसाठी पौष्टिक पदार्थ तयार करण्यासोबतच उद्योजकतेकडे जाणारा मार्गही दाखवते," असे सांगितले.कार्यक्रमात बक्षीस वितरणाचा समारंभ प्रा. मंगल मोरे यांनी पार पाडला. आभारप्रदर्शन प्रा. वर्षा पाईकराव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नेत्रा शेळके यांनी केले. तर या उपक्रमात डॉ. शीला जिरे यांनी विशेष सहकार्य केले.

महाविद्यालयातील माजी विद्यार्थी लोकेश भावसार जो उच्च शिक्षणासाठी हॉटेल मॅनेजमेंटचा डिग्री कोर्स करत आहे त्यांनी विशेष उपस्थिती नोंदवली आणि विद्यार्थिनींना मार्गदर्शन केलेपोषण महोत्सवाच्या अनुषंगाने आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थिनींनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद व सादर केलेले पौष्टिक फराळ पदार्थ ही संपूर्ण स्पर्धेची खास वैशिष्ट्ये ठरली.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनसचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## अल्झायमर रोखण्यासाठी सम्यक आहार, व्यायाम आणि सामाजिक सहकार्य गरजेचे - डॉ. राजेंद्र बगाटे



**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन व सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'यशवाणी वेब रेडिओ'वर 21 सप्टेंबर रोजी असणाऱ्या 'जागतिक अल्झायमर दिनानिमित्त' विशेष आरोग्य संवादाचे आयोजन करण्यात आले.

कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे आणि प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रेसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात डॉ. राजेंद्र बगाटे यांनी अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले.डॉ. बगाटे म्हणाले की, "अल्झायमर हा केवळ स्मरणशक्ती हरवण्याचा आजार नाही, तर तो व्यक्तीच्या ओळखीवर आणि आत्मसन्मानावर परिणाम करणारा विकार आहे.

वृद्धांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांना मानसिक व सामाजिक आधार देणे आणि गैरसमज दूर करणे हीच खरी मानवतेची ओळख आहे." अल्झायमर रोखण्यासाठी सम्यक आहार, नियमित व्यायाम आणि सामाजिक सहकार्य यांची तितकीच आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच त्यांनी अल्झायमर या वृद्धावस्थेशी निगडीत गंभीर आजाराचे वैद्यकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पैलू स्पष्ट केले.अल्झायमरची प्रमुख कारणे म्हणजे वाढते वय, अनुवंशिकता, अस्वास्थ्यकर जीवनशैली, मानसिक तणाव आणि सामाजिक एकाकीपणा असल्याचे त्यांनी सांगितले. यासोबतच नियमित व्यायाम, संतुलित आहार, तणावरहित जीवन, सामाजिक सहभाग आणि स्मरणशक्ती वाढवणारे बौद्धिक खेळ हे प्रतिबंधात्मक उपाय उपयुक्त ठरतात, असे ते म्हणाले.

"अल्झायमर हा फक्त वैद्यकीय प्रश्न नाही; तो सामाजिक, आर्थिक आणि भावनिक गुंतागुंतीचा मुद्दा आहे. त्यामुळे समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि वैद्यकीय दृष्टिकोनातून एकत्रित उपाययोजना करणं गरजेचं आहे," असे डॉ. बगाटे यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी प्रास्ताविक करून आरोग्य संवादाची रूपरेषा मांडली व सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दृक-श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जदीप निकम, तंत्रज्ञ श्री. गिरीश गवळ, समन्वयक श्री. प्रकाश सापनर व श्री. ऋषिकेश भडके यांनी सहकार्य केले.

हा कार्यक्रम यशवाणी पोर्टलवर श्रोत्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आला असून आपल्या आवडीनुसार व सवडीनुसार श्रवण करण्याचे आवाहन अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले आणि या यशवाणी आरोग्यसवांदाची यशस्वी सांगता झाली.






## कालिकादेवी विद्यालयाच्या श्रेयश कांबळेला जिल्हास्तरीय ज्यूदो स्पर्धेत प्रथम क्रमांक





**शिरूर कासार :** दि.१८/०९/२०२५ गुरुवार रोजी 'महाराष्ट्र शासनाच्या' शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांच्या अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद,बीड आयोजित जिल्हास्तरीय शालेय ज्यूदो स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते.

ही शालेय ज्यूदो क्रीडा स्पर्धा वयोगट १४ वर्षाखालील मुलांसाठी होती.या स्पर्धेमध्ये आदर्श शिक्षण संस्था, बीड द्वारासंचलित कालिकादेवी विद्यालयाचे मा.प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यालयाचा चि.श्रेयस संतोष कांबळे या विद्यार्थ्याने ४० किलो वजन गटाच्या ज्यूदो स्पर्धेत सहभाग नोंदविला होता.या शालेय ज्यूदो स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक नामांकित शाळेने सहभाग घेतला होता.

मात्र कालिकादेवी विद्यालयाच्या चि.श्रेयस संतोष कांबळे या विद्यार्थ्याने जिल्हास्तरीय ज्यूदो स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. विद्यालयामधील,क्रीडा शिक्षक श्री रवींद्र बडे यांनी चि. श्रेयश कांबळे या विद्यार्थ्यांची ज्यूदो या खेळाची तयारी अतिशय मेहनतीने व कौशल्यपूर्ण करून घेतली होती.

यामुळे विद्यालयातील या विद्यार्थ्यांने शालेय ज्यूदो स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून जिल्हा पातळीवर कालिकादेवी विद्यालयाचे नाव लौकिक करून दाखविले यामुळे परिसरातील क्रीडाप्रेमी, विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या वतीने चि.श्रेयस कांबळे या विद्यार्थ्याचे अभिनंदन होत आहे. अशा प्रकारे कालिकादेवी विद्यालयातील या विद्यार्थ्याला विभागीय पातळीवर जाण्याचा मान मिळाला आहे.

यामुळे, आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव, तथा माझी मंत्री माननीय जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब, माननीय रोहित (भैया) क्षीरसागर, प्रशासन अधिकारी डॉ.राजू मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेश पवार, कार्यवाहक एम.ए. राऊत सर,प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे व सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे व विजेत्याचे अभिनंदन केले आहे.

## केसरजवळगा शाळेत बदलून गेलेल्या सहा शिक्षकांना निरोप




**केसरजवळगा (प्रा. सुधीर पंचगल्ले):** पीएम श्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा केसरजवळगा येथे दिनांक १९ सप्टेंबर रोजी शाळेतून बदलून गेलेल्या सहा शिक्षकांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात चव्हाण सर, गवंडी सर, काळे सर, गुरनाळे सर, जवळेकर सर तसेच क्षीरसागर मॅडम यांचा शाल, श्रीफळ, फेटा व पुष्पहार देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.


कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष अजिज शेख,सरपंच श्रीमती पूजा पटवारी, उपसरपंच जयपालसिंग राजपूत,माजी सैनिक बलभीम जाधव, माजी सरपंच अमोल पटवारी,गैबुशा मकानदार ,तंटामुक्ती अध्यक्ष शिवशंकर कणमुसे, उपाध्यक्ष बिरबलसिंग राजपूत, मान्यवर बालाजी डिगोळे व इंद्रजीत लोखंडे यांची विशेष उपस्थिती लाभली.

तसेच गावातील पालक, अंगणवाडी कार्यकर्त्या, मदतनीस, आशा कार्यकर्त्या, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेतील सहशिक्षक बालाजी भोसले सर, सुनील राठोड सर, संजय भोसले सर, तसेच युवा प्रशिक्षणार्थी वैभव पाटील यांनी योगदान दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी भोसले सर यांनी उत्तमरीत्या केले, तर आभार प्रदर्शन सुनील राठोड सर यांनी मानले. बदलून गेलेल्या शिक्षकांना निरोप देताना शाळा परिवार व गावकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी तरळले. त्यांच्या कार्याचा गौरव करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० सप्टेंबर २०२५

# नात्यांची उसवत चाललेली वीण सांधणारा 'कडूशेवगा'




'कडू शेवगा 'हा ग्रामीण कथांचा संग्रह तात्याराव पवार यांनी समीक्षणासाठी पोहच केला.शिक्षक असल्याने लेखकाचा माणसांच्या सान्निध्यात पालक म्हणून संपर्क येत होता, लेखन कार्यास या माध्यमातून चालना मिळाली , त्यातूनच वास्तवदर्शी लिखाणाचे कथानक , पात्र संवाद ग्रामअनुभवातून आलेले दिसतात.

ग्रामीण भागातील सामाजिक आशय, बोलीभाषेचा वापर हेच अधोरेखित करते. त्यांचा लेखनपिंड बालसाहित्यकाचा असूनही 'माणसातली माणसं' हा कथासंग्रह वाचकांच्या पसंतीस उतरला, ग्रामीण लोकांच्या दैनंदिन समस्या, व्यवहार त्यांनी कथाबीजात अंकीत केल्याचे स्पष्ट जाणवते. अर्थातच तात्याराव पवार यांचे सर्व कथांचे कथा बीज ग्रामीण भागातील 'माणूस 'राहिले आहे. मराठी साहित्य कथालेखनाने समृद्ध करण्यात अनेक कथालेखकांचा सहभाग अग्रणी राहिला आहे शंकर पाटील, वामन होवाळ, आनंद यादव.ग दि मा , बाबुराव बागुल, रा र बोराडे ,प्रतिमा इंगोले, रेखा बैजल , योगीराज वाघमारे अशी लांबलचक नामावली उद्धृत करता येईल....

अलीकडे ग्रामीण कथालेखक म्हणून तात्यारावांची ओळख होते आहे.,,'कडूशेवगा' हा कथासंग्रह त्यादृष्टीने लक्ष वेधून घेतो. एकुण ६ कथा संग्रहात समाविष्ट आहेत. ,पाचुदा 'कथेत खेड्यातील शिक्षित बेरोजगार तरुणाची ससेहोलपट ताकदीने मांडली आहे 'नाशेती कामाचा ना नोकरीचा' अशी धडगत शिवाजी ची झालेली. शेत विकून नोकरी मिळणार होती, त्यातच बहिण- मेव्हणे हिश्यासाठी माहेरी आलेले.कथानायक स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होतो. नोकरीची आर्डर येते , असा सुखद शेवट. कथाशयातील वळसे वाचताना मूळ कथानक भरकटते., मात्र निवेदनशैली वाचकांना बांधून ठेवते, "बाभळीच्या फांदीला पांढरे काटे चमकावेत तसे तीचे हाड दिसत होते.

ती वाळलेला पाला झडून गेलेल्या झाडासारखी वाटत होती. ही शैली शांता बहिणीच्या दयनीय अवस्थेचे दर्शन घडविते. ग्रामीण माणसाच्या भाव भावनांना, सामान्य शेतकरी कुटुंबातील तणाव व नैराश्यतेला शब्दरूप देणारी कडूशेवगा ही शिर्षक कथा एक महत्त्वाची कथा आहे. बनावट बीयाण्यामुळे पिक वाया गेले, लग्नाची उपवर मुलगी, कर्ज ,सर्व जंजाळातून मुक्ती मिळावी म्हणून झोपडी शेजारील शेवग्याच्या झाडास फाशी घेणार्या बापाला मुलं परावृत्त करतात .

नंतर सरकारी मदत व गावकरी यांच्या आर्थिक मदतीमुळे मुलीचं लग्न होतं ,आनंदी किरणं झोपडीत पोहचतात.'वळू हरवला'ही वेगळ्या धाटणीची कथा. सर्वच ऋतू ग्राम जनजीवन कसे प्रभावित करतात हे चित्र रेखाटण्यात पवार चांगले यशस्वी झाले आहेत खेडेगावात वळू हरवतो गवार्यातील गाववळूची अहेमीयत किती असते हे वाचताना मिस्किल निवेदन शैली लक्षवेधी ठरली आहे. तात्यांच्या फीर्यादीनंतर जी वार्ता चर्चेत येते त्यातून बारा बलुतेदारांची काम विभागणी बेमालूमपणे अधोरेखित होते . बोलीभाषेत आलेले संवाद पात्र जीवंत करतात, "आलं आपला वळू हरवलाय म्हण" "शकू, म्याआताच ईडा खाल्यात" असं महणत हरी पिचकारी मारतो. ही कथा पशुसंवर्धन व प्रेम अधोरेखित करते.

भावकीच्या वादात व दारिद्याच्या दलदलीत होरपळणाऱ्या सखूची विषन्न करणारी कहाणी 'काटेशैवरी' त दिसते. दीर्घतेमुळे व कथाबीजातील रसभेसळीमुळे दुर्बोधता जाणवते तरीही, मनोज्ञ निसर्गवर्णनयुक्त चित्तवेधक निवेदनशैली व टाटातूटीचे कथानक असल्याने शेवटपर्यंत ओढ लागून राहते. भावकीवादाचे विकोपाला गेलेले वितुष्ट, मोठ्या भावाचा फसलेला खुनाचा प्रयत्न.आपप्पा बेपत्ता झाल्याने निराश्रित सखू लहान मुलास घेऊन वणवण भटकत असते.

सखू म्हणजे ग्रामीण स्त्री शोषणाचं मूर्तीमंत प्रतीक. उभं पिक वार्यावर सोडून आज तीच वार्यावर निघाली होती. आज तिचंच आयुष्य वार्यावर होतं विदारक परिस्थितीचा हुबूहुब देखावा निर्माण करणारी अस्सल ग्रामीणशैली कथेचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. 'दिढी' कथेत गरीब शेतकरी गावपाटलाकुडून कसा पिचला जातो याचे दारुण चित्र आले आहे. झडीत उपासमारीने हतबल शेतकरी दीडपट बोलीने धान्य घेतो . वाळलेला गोघासही लहान मुलांना मिळत नाही .

सुगीच्या हंगामात हातातोंडाशी आलेली आखबी धान्याची रास पाटील वसूल करून निघतांना दोन्ही केविलवाण्या नजरेने पाहत असतात, हे जळजळीत वास्तव चित्रण लेखकाने ताकदीने उभे केले आहे 'कावळा शिवला' कथा अंधश्रद्धा व पुरुष प्रधान संस्कृतीची चिरफाड करते. नायिका रत्ना रूढार्थाने आलेल्या अज्ञानाची बळी ठरतेघरकामासाठी नणंदा शाळेतून काढून पाटावर धुणं धुण्यासाठी पाठवतात , पाय घसरून तिचा पाण्यात वाहून मृत्यू होतो असं गाव समजतं .

तीला दुरवर वाचविण्यात यश येतं.दुसर्या गावातील कुटुंब मुलीसारखं वागवतात . बालिका शोषणाची पिळवटून टाकणारी शोकांतिका कथेत अनेक अंगांनी अंतर्मुख करते. पवार यांनी कथालेखनात घटना, प्रसंगानुरूप काळाचे योग्य भान राखले आहे.तथापि घटनाओघात धुडगूस घालणारे अनावश्यक विषय कटाक्षाने टाळावेत. पात्राला साजेशी भाषा हे कथासंग्रहाचे गुणविशेष आहे, दीर्घतेमुळे कथानक भरकटते यावर आवर घालता येईल! हा विचार अग्रणी व्हावा.

गुगल वरून ग्रामीण जीवन दर्शन घडविणारे मुखपृष्ठ संग्रहाची शोभा वाढवते. अतिशय अभ्यासपूर्ण व माफक अपेक्षा असलेली प्रस्तावना लिहून डॉ सौ◌ॅ सुनिता राठोड यांनी वाचक वर्गाची उत्कंठा वाढवली आहे. गाझियाबाद च्या समदर्शी प्रकाशनाने कुठेही अमराठी भाषिकतेची खूण पुस्तकात येऊ दिली नाही, हे विशेष. अतिशय सुंदर, सुबक व वाचनीय संग्रह वाचकांच्या हाती ठेवला आहे. सामाजिक मूल्यांची पडझड, अहंकार व स्वार्थी वृत्तीमुळे माणूस हरवत चाललेली ग्रामीण व्यवस्था.

निसर्गाचा लहरीपणा व खेड्यातील आर्थिक दरी रुंदावणारा आधुनिक सुविधांचा परिणाम .अशा विविधांगी विषयामुळे कथाबीज सशक्त व कसदार झाले आहे नात्यांची उसवत चाललेली वीण शिवणारा 'कडूशेवगा ' हा कथासंग्रह वाचकांना नक्कीच अंतर्मुख करेन यांत तिळमात्र शंका नाही. भविष्यात एक प्रथितयश कथाकार म्हणून तात्याराव पवार यांची गणती होईल याची खात्री बाळगतो. भरभरून शुभेच्छा देतो!!!



**समीक्षण : विद्रोही कवी साहेबराव मोरे**

संवाद:९४०४०४८६०१कडू
शेवगा: कथासंग्रह
लेखक: तात्याराव पुंजाबा पवार
प्रकाशन: समदर्शी प्रकाशन
गाझियाबाद (उ. प्र.)
किंमत २५०₹

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० सप्टेंबर २०२५

# जागतिक स्वच्छता दिन : समाजपरिवर्तनाचा शाश्वत मार्ग

मानव समाजाचा विकास केवळ तांत्रिक प्रगतीवर, औद्योगिक उन्नतीवर किंवा भौतिक सुखसुविधांच्या उपलब्धतेवर होत नाही, तर त्यामागे एक महत्त्वाचा पाया असतो आणि तो म्हणजे स्वच्छता होय. स्वच्छतेशिवाय आरोग्य, आरोग्याशिवाय श्रमशक्ती, श्रमशक्तीशिवाय उत्पादन आणि उत्पादनाशिवाय समाजाची प्रगती अशक्य आहे. म्हणूनच इतिहासापासून आधुनिक काळापर्यंत जगातील सर्व समाजांमध्ये स्वच्छतेला सामाजिक मूल्य, नैतिक कर्तव्य आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग मानले गेले आहे. मात्र विसाव्या शतकानंतर झालेल्या औद्योगिकीकरणाने, वेगवान शहरीकरणाने आणि उपभोक्तावादी संस्कृतीने जगासमोर कचऱ्याचे व्यवस्थापन, पाण्याचे प्रदूषण, वायुप्रदूषण आणि जमिनीची धोकादायक नासाडी असे प्रश्न उभे केले आहेत. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र महासभेने दि. ८ डिसेंबर २०२३ रोजी ठराव क्र. A/RES/78/122 मंजूर करून दरवर्षी २० सप्टेंबर हा जागतिक स्वच्छता दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला.

जागतिक स्वच्छता दिन हा दिवस फक्त कचरा गोळा करण्याचा दिवस नाही, तर तो समाजातील प्रत्येक घटकाला, प्रत्येक नागरिकाला आणि प्रत्येक राष्ट्राला सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देतो. स्वच्छता ही आरोग्याची पायरी आहे, परंतु तिच्या पुढे सामाजिक न्याय, समता, पर्यावरणीय संरक्षण आणि आर्थिक समृद्धीचेही आयाम दडलेले आहेत. त्यामुळेच या दिवसाचे समाजशास्त्रीय महत्त्व अधोरेखित होते.

स्वच्छतेचा समाजशास्त्रीय अभ्यास केला, तर दिसते की समाजातील वेगवेगळ्या गटांमध्ये स्वच्छतेच्या संकल्पना भिन्न असतात. ग्रामीण समाजातील लोक स्वच्छतेला पारंपरिक परंपरांशी जोडतात, जसे की दररोज अंगण झाडणे, शौचालयात जाऊन आल्यानंतर हातपाय धुणे, घरातील पवित्रता राखणे. शहरी समाज मात्र आधुनिक साधनसामग्रीच्या मदतीने कचरा व्यवस्थापन करतो, परंतु प्लास्टिकच्या अतिरेकी वापरामुळे शहरातील प्रदूषणाची समस्या अधिक तीव्र झाली आहे. एका गटाची अस्वच्छता दुसऱ्या गटावर आघात करते, उदा. शहरातील नाले गावाकडे वाहून जातात आणि तेथील पिण्याचे पाणी दूषित करतात. यावरून स्वच्छतेचा प्रश्न केवळ वैयक्तिक नसून सामूहिक आहे, हे स्पष्ट होते.

समाजातील असमानता आणि स्वच्छता यांचे नातेही महत्त्वाचे आहे. गरीब वस्त्यांमध्ये राहणारे लोक सुरक्षित, स्वच्छ पाणी व शौचालयाच्या सुविधांपासून वंचित असतात. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांवर त्यांना मोठा खर्च करावा लागतो, परिणामी दारिद्र्य अधिक वाढते. उलट, सधन वर्ग आरोग्यसुविधा परवडल्यामुळे या संकटापासून वाचतो. म्हणूनच स्वच्छतेचा प्रश्न हा सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. जागतिक स्वच्छता दिन या असमानतेकडे जगाचे लक्ष वेधतो आणि सर्वांना समान आरोग्यदायी वातावरण मिळवून देण्याचे आवाहन करतो.

आरोग्य आणि स्वच्छतेचे नाते तर अविभाज्यच आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार दरवर्षी लाखो लोक दूषित पाणी आणि अस्वच्छतेमुळे होणाऱ्या रोगांमुळे मृत्यूमुखी पडतात. भारतातही डेंग्यू, मलेरिया, कॉलरा अशा साथरोगांचा प्रसार अस्वच्छतेमुळे होतो. भारतात 'स्वच्छ भारत अभियान' या राष्ट्रीय उपक्रमाने खुले शौचालय निर्मूलन आणि कचरा व्यवस्थापनात लक्षणीय प्रगती साधली असली, तरीही भारतीय लोकांच्या मानसिकतेत बदल घडवण्याचे कार्य अद्याप अपूर्ण आहे. स्वच्छतेला जीवनशैलीत सामावून घेणे ही खरी आवश्यकता आहे.

पर्यावरणीय दृष्टिकोनातून पाहिले, तर कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न जगासमोर भयानक रूपात उभा आहे. प्लास्टिकच्या प्रदूषणाने समुद्री प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. औद्योगिक सांडपाण्यामुळे नद्या आणि तलावांचे पाणी विषारी झाले आहे. जंगलात पडणाऱ्या घनकचऱ्यामुळे जैवविविधता नष्ट होत आहे. हवामान बदलाचे वेगाने वाढणारे प्रमाणही कचरा व्यवस्थापनातील त्रुटींशी निगडित आहे. अशा परिस्थितीत जागतिक स्वच्छता दिन हा केवळ स्वच्छतेचा नव्हे, तर पर्यावरण वाचविण्याचा दिवस म्हणून पाहिला पाहिजे.

स्वच्छतेचा आर्थिक परिणाम देखील तितकाच महत्त्वाचा आहे. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांवर मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक व खाजगी खर्च होतो. कामगारशक्ती आजारी पडल्यामुळे उत्पादनक्षमता घटते. पर्यटनाच्या दृष्टीने स्वच्छ शहरं व खेडी हे नेहमीच आकर्षण ठरतात. स्वच्छता राखणारी गावे व जिल्हे हे विकासाच्या दिशेने वेगाने प्रगती करतात. म्हणूनच आर्थिक प्रगतीसाठी स्वच्छतेचे भांडवल म्हणून पाहिले पाहिजे.

संस्कृती आणि स्वच्छता यांचे नाते भारतीय समाजासाठी विशेष आहे. आपल्या धार्मिक परंपरांमध्ये स्वच्छतेला पवित्रतेचे रूप दिले गेले आहे. धार्मिक स्थळे, घरे, अंगणे स्वच्छ ठेवणे हे धार्मिक कर्तव्य मानले गेले. परंतु आज या परंपरांचा लोप होत आहे. उत्सवांमध्ये निर्माल्य, प्लास्टिक सजावट यामुळे नद्या व तळी प्रदूषित होतात. त्यामुळे स्वच्छतेची खरी परंपरा नव्या पिढीला समजावून सांगणे व ती आधुनिक जीवनशैलीशी जुळवून घेणे अत्यावश्यक आहे.

स्वच्छतेची खरी चळवळ लोकसहभागातूनच यशस्वी होऊ शकते. सरकारने कितीही योजना आखल्या तरी नागरिकांचा सहभाग नसेल, तर त्या योजनांना यश मिळणे कठीण आहे. शाळांमधील विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, स्थानिक ग्रामपंचायती या सर्वांचा सहभाग स्वच्छता चळवळीला उर्जा देतो. त्याचबरोबर कचरा गोळा करणाऱ्या कामगारांचे योगदान विसरून चालणार नाही. त्यांच्या श्रमांमुळेच शहरं व गावं स्वच्छ राहतात. त्यांना सामाजिक सन्मान व सुरक्षितता देणे ही समाजाची जबाबदारी आहे.

स्वच्छतेचा प्रश्न हा जागतिक विकास उद्दिष्टांशी थेट संबंधित आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने ठरवलेले आणि १ जानेवारी २०१६ रोजी लागू केलेले १७ शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) स्वच्छतेशिवाय साध्य होऊ शकत नाहीत. ही उद्दिष्टे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय स्थिरता साधण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारतात. गरिबी निर्मूलन, चांगले आरोग्य, लिंगसमता, शाश्वत शहरे, हवामान कृती, स्वच्छ पाणी व स्वच्छता या सर्व ध्येयांचा पाया स्वच्छतेवरच आहे. त्यामुळे जागतिक स्वच्छता दिन हा प्रत्यक्षात शाश्वत विकासाच्या अजेंड्याला गती देणारा दिवस आहे.

या सर्व विवेचनावरून असे स्पष्ट होते की जागतिक स्वच्छता दिन हा फक्त एका दिवसापुरता प्रतीकात्मक कार्यक्रम नाही, तर तो सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक बदल घडवण्याचे साधन आहे. २० सप्टेंबरचा हा दिवस प्रत्येकाला स्वतःच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देतो. आपल्या घरापासून ते शाळा, रस्ते, समाज, गाव, शहर आणि शेवटी राष्ट्र व जग या सर्व स्तरांवर स्वच्छतेची चळवळ रुजली, तरच समाज परिवर्तन शक्य आहे.

आज गरज आहे ती केवळ कचरा उचलण्याची नाही, तर मानसिकतेत बदल घडवण्याची. 'माझ्या एका कृतीने काय फरक पडणार?' ही संकुचित मानसिकता मोडून 'मी बदललो तर समाज बदलेल' ही जाणीव मनोमन स्वीकारणे ही खरी स्वच्छतेची सुरुवात आहे. जागतिक स्वच्छता दिन हाच संदेश देतो की स्वच्छता ही व्यक्तीगत सवय नसून सामूहिक संस्कृती आहे.

शेवटी, जागतिक स्वच्छता दिन आपल्याला सांगतो की स्वच्छता म्हणजे आरोग्य, पर्यावरण, अर्थकारण, सामाजिक समता आणि सांस्कृतिक मूल्ये यांचा संगम आहे. २० सप्टेंबरचा हा दिवस आपण सर्वांनी सामूहिक जबाबदारीचा दिवस म्हणून पाळला, तर तो समाजपरिवर्तनाचा पाया ठरेल. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेला जीवनशैलीत सामावून घेतले, तरच हा दिवस खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
**ईमेल –**
bagate.rajendra5@gmail.com